**<u>नियमीत दिवाणी दावा नं.११०/२०१९ मधील नि.२२ खालील आदेश</u>**
**<u>(तानाजी बुरूंगले इ. वि. गणेश बुरूंगले इ.)</u>**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला सुमारे २ वर्ष ३ महिन्यांचा विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

**२.** अर्जात प्रतिवादींचे कथन की, सदरचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द सरसनिरस मानाने वाटपाचा दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादी यांना सदरचे वाद मिळकतीसंबंधीचे आवश्यक असणारी जुनी कागदपत्रे मुदतीत मिळाली नाहीत. तसेच त्यांना कोरोना प्रादुर्भावामुळे हजर राहून कैफियत देणे अशक्य झाले. त्यामुळे त्यांना कैफियत दाखल करणेसाठी सुमारे २ वर्षे ३ महिन्यांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब त्यांनी जाणूनबुजून केलेला नाही. तरी नैसर्गिक न्याय मिळणेच्या दृष्टीने सदरचा विलंब माफ करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**३.** वादीने सदर अर्जाखाली आपले म्हणणे दिले की, सदरचा अर्ज खोटा व लबाडीचा असून त्यात कोणतीही सत्यता दिसून येत नाही. सदर प्रतिवादीने हेतु पुरस्सर वेळकाढूपणा केला असून त्याने वादीचा व न्यायालयाचा अमूल्य वेळ वाया घालविला आहे. तरी सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**४.** प्रतिवादी यांचा अर्ज वाचला. वादींचे म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. यावरुन असे दिसते की, वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादी यांचेविरुध्द सरस निरस मानाने वाटपाने पृथक कब्जा मिळणेकरिता दाखल केलेला आहे. अभिलेखांचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र १ यांना दि.१३.०३.२०२१ रोजी समन्स बजावणी झाल्याचे दिसून येते. तसेच प्रतिवादी हे दाव्याकामी दि.१९.०३.२०२१ रोजी हजर झाल्याचे दिसून येते. वास्तविक प्रतिवादी यांना दाव्याचे समन्स मिळालेपासून तेथून पुढे त्यांनी ३० दिवसांच्या आत किंवा त्यापुढे ६० दिवसांच्या आत असे एकूण ९० दिवसांच्या आत कैफियत दाखल करणे गरजेचे होते. कायद्याप्रमाणे कैफियत दाखल करणेची मुदत ९० दिवसांनी संपते. प्रतिवादी यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता, कैफियत

दाखल करण्यास प्रतिवादी क्र. १ यांना साधारण २ वर्षे १७ दिवस इतका विलंब झाल्याचे दिसून येते. सदर विलंबाबाबत त्यांनी कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. तसेच कोरोना कालावधी संपून देखील बराच कालावधी झालेला आहे. प्रतिवादींनी अर्जाबाबत दिलेले कारण संयुक्तिक वाटत नाही. तरी सदरचा दावा वाटपाचा असल्यामुळे व प्रतिवादी यांचे मौल्यवान हक्क व हितसंबंध दावा मिळकतीमध्ये गुंतलेले आहेत. दावा गुणदोषावर चालण्यासाठी प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर असणे गरजेचे आहे. विलंबाबाबतचे कारण जरी संयुक्तिक वाटत नसले तरी प्रतिवादी यांनी अर्जाचे पुष्ट्यर्थ नि.२३ खाली शपथपत्र दाखल केले आहे. त्यानुसार अर्जातील कथने ते प्रतिज्ञापत्रावर करत आहेत. न्यायाच्या दृष्टीने ती स्वीकारणेत येत आहेत. सदरच्या प्रदीर्घ विलंबाच्या कालावधीबाबत वादी यांना खर्चाची रक्कम देवून सदर प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर करणे योग्य होईल. दावा गुणदोषावर चालण्यासाठी प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करणे गरजेचे आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादी यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज नि.२२ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांना कैफियत दाखल करणेस झालेला विलंब वादीस रक्कम रु.१०००/- देण्याच्या अटीवर माफ करण्यात येतो.

( **के. बी. सोनवणे** )

दि. २७/१०/२०२३.

दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgement/order :-

| | | | |
|---|---|---|---|
| **(a)** | Name of the Stenographer | **:-** | A.S.Yadav |
| **(b)** | Court | **:-** | 2nd Jt. Civil Judge Junior Division and Judicial Magistrate First Class, Sangola. |
| **(c)** | Judgment/Order signed by PO on | **:-** | 27/10/2023. |
| **(d)** | Judgment/Order uploaded on | **:-** | 27/10/2023. |